८७/८३/आठ

क्रमांक एससीवाय-१०८३/७८०-सीआर ५१५४/सोळा,
**ग्राम विकास विभाग,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ३ मार्च १९८३.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
(मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी वगळून)
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

**विषय :-** टंचाईच्या काळात कोणत्याही विहिरीमधून, तलावातून आणि अन्य जलाशयांतून पिण्याकरिता पाणीपुरवठयाचे अधिग्रहण करणे.

महाराष्ट्र पिण्याच्या पाणीपुरवठयाचे अधिग्रहण करण्याबाबत अध्यादेश, १९८३ (सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५), हा टंचाईच्या काळात कोणत्याही विहिरींमधून, तलावांतून आणि अन्य जलाशयांतून पिण्याकरिता पाणीपुरवठयाचे अधिग्रहण करण्याची तरतूद करण्यासाठी प्रख्यापित करण्यात आला आहे. (शीघ्र संदर्भाकरिता सोबत प्रत जोडली आहे). हा अध्यादेश ताबडतोब अंमलात येत आहे. या अध्यादेशातील महत्त्वाच्या गोष्टी खालीलप्रमाणे आहेत :-

२. **सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश ५ याचे कलम ३.**

(एक) **पाण्याचे अधिग्रहण करण्याचा अधिकार ---** या कलमाप्रमाणे जिल्हयाधिकाऱ्याला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याला, (यात यापुढे ज्याचा निर्देश "अधिग्रहण प्राधिकारी" असा केला आहे) लेखी आदेश काढून विहिरीच्या मालकाला पाणीपुरवठयासंबंधी फर्माविण्याचा अधिकार दिलेला आहे. मालकाने, अधिग्रहण प्राधिकाऱ्याला किंवा त्याच्या प्रतिनिधीला किंवा तत्सम व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गांना किंवा कालव्याच्या सिंचनक्षेत्रात असलेल्या कोणत्याही जमिनीतील, किंवा कोणत्याही अन्य जमिनीतील कोणत्याही विहिरीचे जलसिंचनासाठी किंवा कोणत्याही अन्य प्रयोजनासाठी वापरले जाणारे पाणी, जनतेच्या पिण्याच्या प्रयोजनाकरिता वापरण्यासाठी संपूर्णतः किंवा अंशतः पाणी पुरवठा दिला पाहिजे किंवा तशी व्यवस्था केली पाहिजे किंवा पाणी घेण्याची अथवा त्याचा उपसा करण्याची (Lift) परवानगी दिली पाहिजे असे सांगण्यात येईल. अधिग्रहण प्राधिकाऱ्याने तत्पूर्वी त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केली पाहिजे आणि कोणत्याही स्थानिक क्षेत्रात पिण्याच्या पाण्याच्या टंचाईमुळे पाण्याचे अधिग्रहण करणे जरुर किंवा इष्ट असल्याबद्दल खात्री करुन घेतली पाहिजे. अधिग्रहण प्राधिकाऱ्याच्या आदेशात, किती पाणी घेण्यात येईल, कधी घेण्यात येईल, कोणत्या रीतीने घेण्यात येईल तसेच पाणीपुरवठयाची मुदत व वेळा या गोष्टी नमूद करण्यात येतील, या कलमाखालील आदेशात वेळोवेळी सुधारणा करण्याचा किंवा कोणत्याही वेळी आदेश रद्द करण्याचा अधिकारदेखील अधिग्रहण प्राधिकाऱ्याला देण्यात आला आहे.

(दोन) **या कलमाखाली काढलेला आदेश बजावण्याची पद्दती.---** विहिरीचा मालक ही एक व्यक्ती असेल तर, या कलमाखाली काढलेला आदेश, अधिग्रहण प्राधिकाऱ्याने, त्याच्याकडे तो आदेश सुपूर्द करुन किंवा देऊ करुन बजावावा किंवा जिच्यावर आदेश बजावायचा ती व्यक्ती भेटणे शक्य नसेल तर, तिच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ व्यक्तीकडे आदेशाची अभिप्रमाणित प्रत ठेवून बजावावा किंवा टपालाने बजावावा संस्था किंवा भागीदारी संस्था यांच्याशी संबंधित आदेश असेल तर तो, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या पहिल्या अनुसूचीतील यथास्थिति नियमावली २९ च्या नियम २ मधील किंवा नियमावली ३० च्या नियम ३ मधील समन्स बजावण्याच्या रीतीने बजावण्यात येईल. त्यात अशी तरतूद आहे की संस्थेच्या चिटणीसावर किंवा संचालकावर किंवा अन्य मुख्य अधिकाऱ्यावर आदेश बजावता येईल किंवा तो नोंदणीकृत कार्यालयात ठेवता येईल अथवा टपालाने पाठवता येईल अथवा कार्यालय नसेल तर जेथे संस्थेचा व्यवसाय चालत असेल अशा ठिकाणी पाठवता येईल.

ज्यांच्यावर आदेश बजावायचा त्या व्यक्ती म्हणजे भागीदारी संस्थेचे भागीदार असतील तर भागीदारांपैकी कोणाही एकावर किंवा अनेकांवर आदेश बजावला पाहिजे अथवा भागीदारी व्यवसाय चालणाऱ्या मुख्य जागी आदेश बजावला पाहिजे.

(तिन) **या कलमाखाली काढलेल्या आदेशाला प्रसिद्दी देणे.---** अधिग्रहण अधिकाऱ्याने त्याच्या मते आदेशान्वये ज्यांना, विनामूल्य, पाणी उपलब्ध करुन देण्यात येईल त्या व्यक्तीच्या निदर्शनास तो ज्या उत्तम रीतीने येईल त्या रीतीने उक्त आदेशास स्थानिक क्षेत्रात व्यापक प्रसिद्दी दिली पाहिजे.

(चार) **आदेशाचे पालन न करणे किंवा उल्लंघन याबद्दल शिक्षा.** --- या कलमान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन करण्यास नकार देणाऱ्या किंवा त्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, अपराधसिद्दीनंतर एक वर्षापर्यत असू शकेल इतकी कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतकी दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**३. सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे कलम ४. ---**कोणत्याही विहिरीतून पाणी पुरवण्यासाठी कलम ३ अन्वये अधिग्रहण प्राधिकाऱ्याने आदेश काढण्यासंबंधीची मार्गदर्शक तत्त्वे या कलमात घालून देण्यात आली आहेत. आदेश देण्यापूर्वी अधिग्रहण प्राधिकाऱ्याने पुढील गोष्टी विचारात घ्यावयाच्या आहेत---

(अ) विवक्षित मुदतीत विहिरीत उपलब्ध होणारा किंवा तशी शक्यता असणारा एकूण पाणी--पुरवठा.

(ब) मालकाचा त्या मुदतीत पिण्यासाठी, सिंचनासाठी व इतर कारणांसाठी वैयक्तिकरीत्या लागणारे किमान पाणी आणि.

(क) जेथे पिण्याच्या पाण्याची टंचाई असेल त्या स्थानिक क्षेत्रात रहाणाऱ्या लोकांना वाटून देण्यांकरिता म्हणून वाजवीरीत्या किती पाणी देता येईल ते.

४. **सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे कलम ५.** ---(एक) या कलमानुसार अधिग्रहण प्राधिकाऱ्याला कोणत्याही विहिरीच्या मालकाला निदेश देण्याचा अधिकार देण्यात आला आहे. ही सूचना, कलम ३ अन्वये आदेश काढावा किंवा चालू ठेवावा की नाही हे ठरविण्यासाठी पुढील माहिती प्रस्तुत करण्यासंबंधी असेल.---

(अ) विहिर कोणत्या जमिनीत आहे.

(ब) त्या विहिरीतून उपलब्ध होणारा पाणी पुरवठा.

(क) गेली काही वर्षे तो मालक त्या विहिरीतील पाणी कशासाठी व किती प्रमाणात वापरत आहे ते. (निर्देशात किती वर्षे ते नमुद करावे).

(ड) ही माहिती किती दिवसांत प्रस्तुत करावयाची ती मुदत.

(दोन) त्याचप्रमाणे या कलमांन्वये अधिग्रहण प्राधिकाऱ्यास कोणत्याही विहिरीच्या मालकास वाजवी पूर्व सूचना देऊन.

(अ) अशा कोणत्याही जमिनीत, आवश्यक वाटतील अशा सहकाऱ्यांसह व कामागारांसह प्रवेश करण्याचा ; आणि

(ब) कलम ३ खाली आदेश काढण्यात किंवा चालू ठेवण्यात यावा किंवा कसे आणि कोणत्या रीतीने व कोणत्या शर्तीस अधीन ठेऊन असा आदेश काढण्यात यावा हे ठरविण्याच्या दृष्टीने तपासणी व सर्वेक्षण करण्याचा ; अधिकार देण्यात आला आहे.

अधिग्रहण प्राधिकारी, मालकास, अशा तपासणीच्या व सर्वेक्षणाच्या वेळी उपस्थित राहण्यास सांगू शकेल व मालकाच्या कोणत्याही उपकरणांचा वा यंत्र सामग्रीचा वापर करु शकेल आणि आवश्यक ती माहिती गोळा करण्यासाठी आवश्यक त्या अन्य सर्व गोष्टी करु शकेल.

(तीन) या कलमामध्ये अपराधसिद्दीबद्दल तरतूद आहे. जर कोणी या कलमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाचे अनुपालन करण्यास नकार देईल किंवा त्या निदेशाचे उल्लंघन करील किंवा या कलमान्वये अधिग्रहण प्राधिकाऱ्याला किंवा त्या सहाय्यकांना किंवा कामगारांना दिलेल्या कोणत्याही अधिकाराचा कायदेशीर वापर

करण्यात आडकाठी करील, तर त्यास दोषसिद्धीनंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

५. **सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे कलम ६**.--- या कलमाने, अधिग्रहण प्राधिकाऱ्याला व लोकांना विहिरीवर पाण्यासाठी हक्काने जाण्याचा जरुर तो कायदेशीर अधिकार बहाल करण्यात आला आहे. अधिग्रहण प्राधिकारी आणि त्याने त्या संदर्भात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्ती, यांना त्या जमिनीत ;

(एक) पाणीपुरवठयाचे नियमित संपादन व मंजूर पाणीपुरवठयाचे वाटप करण्याच्या व्यवस्थेवर देखरेख व त्याचे नियमन करण्याच्या प्रयोजनासाठी ;

(दोन) अशा पाणीपुरवठयाशी संबंधित अशा अन्य कोणत्याही कामासाठी वाजवी वेळेत, प्रवेश करण्याचा हक्क याद्वारे देण्यात आला आहे. अधिग्रहण प्राधिकाऱ्याने तो लादील अशा शर्तीस अधीन राहून, लगतच्या जमिनीतून ये-जा करण्यास प्राधिकृत केल्याचे आणि विहिर ज्या जमिनीत असेल त्या जमिनीत, पाणी काढण्याकरिता किंवा पाण्याचा उपसा करण्याकरिता प्राधिकृत केल्याचे, आणि अधिग्रहण प्राधिकाऱ्याने त्यांना वेळोवेळी मंजूर केलेले पाणी घेण्यास प्राधिकृत केल्याचे ज्यांच्या बाबतीत समजण्यात येईल, अशा व्यक्ती किंवा व्यक्तीचे वर्ग विनिर्दिष्ट करावे.

या अध्यादेशान्वये पाणी घेणारी किंवा पाणी घेण्याचा प्राधिकार असलेली कोणतीही व्यक्ती जर या अध्यादेशाच्या कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या नियमाचे किंवा त्याखाली लादलेल्या कोणत्याही शर्तीचे पालन करण्यास नकार देईल किंवा उपबंधाचे उल्लंघन करील तर तिला, दोषसिद्धीनंतर शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल. अशीही या कलमात तरतूद आहे.

६. **सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ यांचे कलम ७**.---या कलमामध्ये, अधिग्रहण अधिकाऱ्याकडून कोणतेही नुकसान आल्यास ते लवकरात लवकर भरुन देण्यासंबंधी तरतूद आहे. त्याद्वारे अधिग्रहण अधिकाऱ्यास किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, विहिरीवर किंवा विहिरीजवळ, पाणी काढण्याकरिता किंवा उपसण्याकरिता किंवा त्याची मोजणी करण्याकरिता कोणतेही उपकरण किंवा यंत्रसामग्री बसवण्यास आणि संबंधित जमिनीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला तसे करण्याचा आपला उद्देश कळवणारी वाजवी नोटीस दिल्यानंतर त्या जमिनीत प्रवेश करण्यास आणि विहिरीतील पाणी अधिग्रहण प्राधिकाऱ्यांनी निवडलेल्या वितरण केंद्राकडे किंवा केंद्राकडे नेण्यासाठी म्हणून अशा जमिनीमधून, जमिनीवरुन किंवा जमिनीखालून पाण्याचे नळ टाकण्याकरिता व वेळोवेळी अशा उपकरणाच्या, यंत्रसामग्रीच्या किंवा पाण्याच्या नळांच्या दुरुस्तीकरिता किंवा ते बदलण्यासाठी आवश्यक ती सर्व कामे पार पाडण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे. अधिग्रहण अधिकाऱ्याने याबाबतीत काळजी घेतली पाहिजे की नुकसान शक्य तेवढे कमी होईल आणि जर झालेच तर व्यवहार्य असेल एवढया कमी वेळात त्याची भरपाई केली जाईल. काम पार पाडताना कोणत्याही जमिनीच्या मालकाचे किंवा भोगवठादाराचे बरेच नुकसान झाले आहे अशी अधिग्रहण प्राधिकाऱ्याची खात्री झाली तर त्याने त्याबाबतीत आदेश काढून रक्कम ठरवावी व ती त्याला द्यावी. या कलमामध्ये अपिलाची देखील तरतूद आहे. या कलमाखाली काढलेल्या आदेशामुळे व्यथित झालेली व्यक्ती आदेश मिळाल्या पासून ३० दिवसांत, तो आदेश जिल्हयाधिकाऱ्याचा नसेल तर जिल्हयाधिकाऱ्याकडे आणि तो आदेश जिल्हाधिकाऱ्याचा असेल तर आयुक्ताकडे अपील करु शकेल.

जो कोणी, अधिग्रहण प्राधिकाऱ्याला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तींना या कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा कायदेशीर वापर करण्यास आडकाठी करील, त्यास दोषसिद्धीनंतर एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

७. **सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे कलम ८**.---या कलमानुसार अधिग्रहण प्राधिकाऱ्याला पाणीपुरवठयाबद्दल विहीर मालकाला पुढील दराने प्रदान करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.---

(१) विहिरीतून पाणी काढण्याकरिता किंवा उपसण्याकरिता मालकाने कोणतेही उपकरण किंवा यंत्र सामुग्री पुरवलेली नसेल त्याबाबतीत दररोज रु. ५ पेक्षा अधिक नसेल एवढा दर.

(२) विहिरीतून पाणी काढण्याकरिता किंवा उपसण्याकरिता मालकाने कोणतेही उपकरण किंवा यंत्र सामुग्री पुरवलेली असेल त्याबाबतीत दररोज रु. १० पेक्षा अधिक नसेल एवढा दर.

किंवा

विहिरीतून पाणी काढण्याकरिता वा उपसण्याकरिता मालकाने कोणत्याही उपकरणाची किंवा यंत्रसामुग्रीची तरतूद केलेली नसेल तेव्हा पुरवण्यात आलेल्या दर १५० लिटरमागे, किंवा एका वेळी १५० लिटरहून अधिक होणार नाही इतके पाणी काढणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमागे, पंचवीस पैसे या दराने, आणि मालकाने, विहिरीतून पाणी काढण्याकरिता किंवा उपसण्याकरिता स्वतःहून एखाद्या उपकरणाची या यंत्रसामग्रीची तरतूद केलेली असेल तेव्हा दर १५० लिटरमागे किंवा एका वेळी १५० लिटर्सहून अधिक होणार नाही एवढे पाणी काढणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमागे, पन्नास पैसे या दराने रक्कम देण्यात येईल.

८. **सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे कलम ९**.---या कलमात, मालकाने किती पाणी स्वतः वापरावे व किती पाण्याचे वाटप करावे हे ठरविणा-या, अधिग्रहण आदेशातील भागाविरुध्द अपील करण्याबाबतची तरतूद आहे. हे अपील, मालकाला आदेश मिळाल्याचा तारखेपासून तीस दिवसांच्या मुदतीत करता येते. जिल्हाधिका-याव्यतिरिक्त कोणत्याही अधिग्रहण प्राधिका-याने आदेश दिला असेल तर जिल्हाधिका-याकडे व जिल्हाधिका-याने आदेश दिला असेल तर, आयुक्ताकडे असे अपील करता येईल. अपील प्राधिका-याने दिलेला आदेश अंतिम असेल आणि त्याविरुध्द कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेतला जाणार नाही.

९. **सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे कलम १२**.---या कलमात, शासन किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था यांच्या मालकीच्या किंवा ताब्यातील विहिरीतून पाणी पुरवठा घेण्यापासून सूट देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

१०. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना अशी सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी किती खाजगी विहिरी, तलाव, पाण्याचे साठे यांतून पाणी घेऊन ते पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेलया गावातील लोकांना पुरवले याबाबतचा अहवाल सोबत जोडलेल्या नमुन्यांत शासनाकडे सादर करावा. असा पहिला अहवाल दिनांक १० मार्च १९८३ पर्यंत शासनाकडे पोचला पाहिजे आणि त्यानंतर दर आठवडयाच्या अखेरीस म्हणजे १७ ते २४, अशाप्रकारे एकत्रित माहिती पुरवण्यात यावी.

**वी. रंगनाथन्,**
**शासनाचे सचिव.**

प्रत

अध्यादेशाच्या प्रतीसह माहितीसाठी अग्रेषित :---
राज्यपालांचे सचिव.
मुख्यमंत्र्यांचे सचिव.
सर्व मंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
मंत्रालयातील सर्व विभाग.
विभागाचे संपर्क अधिकारी, प्रसिद्वी संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
ग्राम विकास विभागातील सर्व अधिकारी व कार्यासन अधिकारी.
सर्व विभागीय आयुक्त.

सर्व तहसीलदार.
सर्व पंचायत समित्याचे गट विकास अधिकारी.
मुख्य अभियंता (ग्रामीण), महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, मुंबई.
मुख्य अभियंता व सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, मुंबई.
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
सर्व जिल्हयातील भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा.
सर्व अधीक्षक अभियंता, परिसर अभियांत्रिक मंडळ.
सर्व कार्यकारी अभियंता, परिसर अभियांत्रिकी मंडळ.
उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा नाशिक/पुणे/औरंगाबाद/नागपूर.

## नमुना

**(१९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश ५ अन्वये अधिग्रहण केलेल्या पाणीपुरवठयासंबंधीची माहिती.)**

१. गाव, तालुका आणि जिल्हा यांची नावे :

२. गावाची एकूण लोकसंख्या :

३. अधिग्रहण केलेल्या विहिरीच्या, तलावाच्या किंवा : जलाशयाच्या मालकाचे नाव.

४. अधिग्रहण केलेल्या पाणीपुरवठयाचे स्वरुप---म्हणजेच ती : विहीर आहे की तलाव आहे किंवा जलाशय आहे, हे आणि त्यांची संख्या.

५. विहीर, तलाव किंवा जलाशय यात उपलब्ध असलेल्या : पाण्याचे एकूण परिमाण.

६. विहीर, तलाव किंवा अन्य जलाशयाच्या मालकाला : लागणाऱ्या पाण्याचे एकूण परिमाण.

७. पिण्याच्या प्रयोजनार्थ अधिग्रहण केलेल्या पाण्यापेक्षा : अधिक असलेल्या पाण्याचे परिमाण.

८. पाणी पुरवठयाचे अधिग्रहण करण्याकरिता काढलेल्या : आदेशांचा क्रमांक व दिनांक

९. अधिग्रहण प्राधिकाऱ्याचे नाव व पदनाम :

१०. अधिग्रहण करण्यात आलेल्या पाण्यासाठी मालक आणि : अधिग्रहण प्राधिकारी यांच्यामध्ये करण्यात आलेल्या कराराद्वारे ठरविण्यात आलेली रक्कम.

११. रक्कम निश्चित करण्याकरिता अंगिकारलेली पद्वतः

१२. विहिरीचे अधिग्रहण करण्याकरिता निश्चित करण्यात आलेली : रक्कम देण्यात आली आहे काय आणि देण्यात आली असेल तर ती केव्हा देण्यात आली आहे.

१३. रक्कम देण्यात आली नसेल तर त्याबद्दलची कारणे.

१४. विहीर, तलाव किंवा अन्य जलाशयाच्या अधिग्रहणाद्वारे : लाभ मिळालेल्या व्यक्तींची संख्या.